# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), मुंबई

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

मुख्य कार्यालय : नवीन प्रशासकीय इमारत क्र.२, ३ रा मजला, रामकृष्ण चेंबुरकर मार्ग, चेंबुर (पुर्व), मुंबई -४०० ०७१
दुरध्वनी : ०२२ - २५२२०००२ फॅक्स नं :- ०२२ - २५२७४०७२
E-mail : lasdcmumbai@gmail.com / lasdc@rediffmail.com / WWW: slasdc.org.in

महाराष्ट्र शासनाचा उपक्रम

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


वाचा: १) शासन निर्णय क्र. -महामं-२००४/प्र.क्र.३८/ विघयो -२ , मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२. / दिनांक ३० नोव्हेंबर , २००४.

२) शासन निर्णय क्र. -महामं-१०/२००३/प्र.क्र.२३६/ विघयो -२ , मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२. / दिनांक ३० नोव्हेंबर , २००४.

३) शासन निर्णय क्र. एलएएस-२०१२/प्र. क्र. १४९/महामंडळे/मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२. / दिनांक १४ मे, , २०१२.

४) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र. क्र. २७५/महामंडळे/मंत्रालय , मुंबई-४०० ०३२. / दिनांक १६ जानेवारी , २०१९.

५) शासन निर्णय क्र. एलएएस-२०२२/प्र. क्र. ९४/महामंडळे/मावक, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२. / दिनांक ०४ नोव्हेंबर , २०२२.

जा.क्र.एलएएसव्हीएम/प्रकल्प/परिपत्रक/ ९६८३ /२०२२-२३ / दिनांक : ०९ / ११ /२०२२

०८/११/२०२२

# परिपत्रक

**विषय:- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या थेट कर्ज योजनेच्या कर्जाची मर्यादा रू. २५,०००/- वरुन रू.१,००,०००/- पर्यंत वाढविण्याबाबत..**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील दारिद्रय रेषेखालील गरजू घटकाची आर्थिक उन्नतीसाठी तसेच त्यांना स्वयंरोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करू देण्याच्या उद्देशाने शासन निर्णय संदर्भ क्र.०१ अन्वये रू. २५०००/- पर्यंत प्रकल्प मर्यादा असलेल्या व्यवसायांकरिता महामंडळाकडील भागभांडवली अंशदानाचे निधीतून थेट कर्ज योजना राबविण्यात येत होती. सदर योजनेमध्ये संदर्भ क्र. ०५ च्या शासन निर्णयान्वये बदल करण्यात आलेला असून महामंडळामार्फत राबविण्यात येणा-या थेट कर्ज योजनेच्या कर्जाची मर्यादा रू. २५,०००/-वरुन रू.१,००,०००/- पर्यंत वाढविण्यात आली आहे.

**१. थेट कर्ज योजनेच्या कर्जाची मर्यादा रू. २५,०००/- वरुन रू.१,००,०००/- पर्यंत वाढविण्यात आल्याने थेट कर्ज योजनेचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.**

| | |
|---|---|
| प्रकल्प मुल्य | रू. १,००,०००/- पर्यंत |
| महामंडळाचा सहभाग | रू. ८५,०००/- (८५%) |
| अनुदान | रू. १०,०००/- (१०%) |
| अर्जदाराचा सहभाग | रू. ५,०००/- (५%) |
| व्याज दर | ४% |
| परतफेड कालावधी | ३ वर्ष (३६ हप्ते) |

## २. योजना राबविणेसाठी लाभार्थीची पात्रता व अटी/शर्ती/निकष

१) संदर्भ क्र. ०१ मधील शासन निर्णया मध्ये नमुद अटी व शर्ती या योजनेस लागु राहतील.
२) अर्जदार मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील असावा.
३) अर्जदार महाराष्ट्रातील रहिवासी असावा.
४) अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्ष असावे.
५) अर्जदाराचे सिबील क्रेडीट स्कोअर ५०० असावा.
६) अर्जदाराने यापुर्वी महामंडळाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
७) अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रू. ३०००००/- यापेक्षा जास्त नसावे.
८) एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल.
९) अर्जदराने आधारकार्ड जोडलेल्या बँक खात्याचा तपशिल सादर करावा.
१०) अर्जदाराने जो व्यवसाय निवडला असेल त्या व्यवसायाचे ज्ञान व अनुभव / प्रशिक्षीत असावा.
११) अर्जदारास महामंडळाचे प्रचलित नियमानुसार व्यवसायास अनुरूप असलेली आवश्यक ती कागदपत्रे / प्रमाणपत्रे / करारपत्रे /कर्जमागणी अर्जा सोबत सादर करणे आवश्यक आहे.
१२) सदर योजनेत साधारणपणे पुरुष् व महिला ५०% आरक्षण, ग्रामिण भागासाठी प्राधान्य राहील. तसेच राज्यस्तरावरील क्रिडा पुरस्कार व्यक्तींना प्राधान्य राहील.
१३) सैन्य दलातील वीरगती प्राप्त वारसाच्या एका सदस्यास प्राधान्याने लाभ देण्यात यावा.
१४) महामंडळाने वेळोवेळी घालून दिलेल्या तसेच संदर्भ क्र. ०१, ०३ व ०४ मधील शासन निर्णयातील अटी व शर्ती प्रमाणे जिल्हाकार्यालयाने कार्यवाही करावी.
१५) अर्जदारास मंजुर कर्ज वितरणापुर्वी,त्याच्या वारसदाराचे बंधपत्र घेण्यात यावे.
१६) अर्जदाराने कर्जमंजुरी नंतर कर्ज वितरणा पुर्वी ०२ जामिनदार (०१ नोकरदार, त्याच्या कार्यालयाकडील विभाग कार्यालय प्रमुखाचे वसुलीसाठी हमीपत्र घेण्यात यावे. ०१ मालमत्ता धारक जामीणदाराच्या मालमत्तेवर महामंडळाच्या कर्जाचा बोजा नोंद करावा.) देणे आवश्यक आहे.
१७) कर्ज वितरणापुर्वी लाभार्थी कडुन वसुली पोटी उत्तर दिनांकीत धनादेश घेण्यात यावेत.
१८) अर्जदाराने मंजुर कर्जाचा पहिला हप्ता वितरीत केल्या नंतर व्यवसायाचा विमा महामंडळ व लाभार्थी यांचे संयुक्त नावे करणे बंधनकारक राहिल. व दर वर्षा विम्याचे नुतणीकरण करणेसाठी होणारा खर्च लाभार्थीने स्वत: करावा.
१९) कर्ज वितरण झाल्यापासून तीन महिन्यानंतर कर्जाची वसूली (मुद्दल व व्याज) या प्रमाणे करावी.

(अनिल रा. म्हस्के)
महाव्यवस्थापक

प्रति,

**प्रादेशिक व्यवस्थापक,** सा.लो.अ.सा.वि.म.(मर्या.)...................
**जिल्हा व्यवस्थापक,** सो.लो.अ.सा.वि.म.(मर्या.).......................

<u>प्रत माहितीसाठी सादर,</u>

**१.** मा. जिल्हाधिकारी......................................
**२.** मा. जिल्हा नियोजन अधिकारी.......................
**३.** मा. सहा. आयुक्त , समाज कल्याण................
**४.** मा. जिल्हा अग्रणी बँक अधिकारी.................

<u>प्रत माहिती व पुढील कार्यवाहीकरिता,</u>

उपमहाव्यवस्थापक, प्रशा/वित्त/वसुली व लेखे/ जमाअ, सा.लो.अ.सा.वि.म.मर्या. मुंबई